# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./2590/२०२३-२४ दिनांक: 12/03 /२०२४.

## // आदेश //

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालय यांनी मृत्युबाबत आगाऊ निर्देश नसताना, 'जेव्हा एखाद्या व्यक्तीस बरे होण्याची आशा नसते आणि त्याला रुग्णालयाद्वारे जीवन समर्थन प्रणाली / उपचार चालू ठेवले जातात, तेव्हा वरील स्थितीत सदर जीवन समर्थन प्रणाली मागे घ्यावी का?' याबाबत MISCELLANEOUS APPLICATION NO. १६९९ OF २०१९ IN WRTI PETITION (CIVIL) NO. २१५ OF २००५, COMMON CAUSE (A REGD. SOCIETY Petitioner (S) VERSUS UNION OF INDIA Respondent (S) INDIAN SOCIETY OF CRTITCAL CARE MEDICINE Applicant या प्रकरणी दिनांक २४.०१.२०२४ रोजी आदेश पारित केलेला आहे.

ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या वरील आदेशाच्या अंमलबजावणी करताना, मृत्युबाबत आगाऊ निर्देश दिलेल्या/निष्पादीत केलेल्या व्यक्तीस त्याच्या सन्मानपुर्वक मृत्युच्या हक्काचा अपेक्षित हेतु साध्य करण्याकामी या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी मा. जिल्हा न्यायाधीशाद्वारे नियुक्त केलेल्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (JMFC) यांनी निष्पादीत केलेल्या 'आगाऊ निर्देशाची (Advance Directives)' एक प्रत स्थानिक शासन किंवा महानगरपालिका किंवा नगरपालिका किंवा पंचायत यांच्या सक्षम अधिकाऱ्याकडे जतन करण्यासाठी सुपुर्द करावयाची आहे. उपरोक्त संदर्भात स्थानिक प्रशासन सदर दस्तऐवज जतन करून त्यांच्या संरक्षणामध्ये (Custody) ठेवण्याकरिता सक्षम अधिकाऱ्याची Custodian म्हणुन नियुक्ती करेल असे निर्देश आहेत,

ज्याअर्थी, डॉ. बिरप्पा तिपण्णा दुधभाते, वैद्यकीय आरोग्य अधिकारी गट-अ, हे मिरा भाईंदर महानगरपालिकेत वैद्यकीय आरोग्य अधिकारी वर्ग-१ या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत असून मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी डॉ. बिरप्पा तिपण्णा दुधभाते, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची संरक्षक (Custodian) म्हणून नियुक्ती करणेस मान्यता दिली आहे,

त्याअर्थी, वरीलप्रमाणे प्रथम श्रेणी दंडाधिकारी (JMFC) यांचेकडुन प्राप्त होणारे आगाऊ निर्देश (Advance Directives) हे दस्तऐवज जतन करणेकामी डॉ. बिरप्पा तिपण्णा दुधभाते, वैद्यकीय अधिकारी, गट-अ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना मा. सर्वोच्च न्यायालयाने, कॉमन कॉज (नोंदणीकृत संस्था) विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या याचिकेमधील दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी संरक्षक (Custodian) म्हणून नामनिर्देशित करत आहे. त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक २४.०१.२०२४ रोजीच्या वरील आदेशाच्या आधिन राहुन याबाबत कर्तव्य व जबाबदारीने कामकाज पहावे.

संबंधितांनी या आदेशाची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेन्वये

(अनिकेत मानोरकर)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
डॉ. बिरप्पा तिपण्णा दुधभाते, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
१. मा. आयुक्त तथा प्रशासक महोदय, मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :
१. उपायुक्त (सार्व. आरोग्य), मिरा भाईंदर महानगरपालिका
२. उपायुक्त, विधि विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका
3. कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग नवि-२०.